महाराष्ट्र शासन,
कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
अश्विनी बॅरेक्स, विभागीय महसूल आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, पिन कोड नं- ४२२१०१
नाशिक कार्यालय दुरध्वनी ०२५३-२९५७४८०/८१
ई-मेल — **krushisevak2023@gmail.com** संकेतस्थळ - krishi.maharashtra.gov.in

विभागीय कृषि सहसंचालक,नाशिक कार्यालयाच्या आस्थापनेवरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट -क संवर्गातील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे **कृषि सेवक** म्हणून निश्चित वेतनावर /एकत्रित मानधनावर सरळसेवेने भरण्याकरिता जाहिरात सन - २०२३.

जाहिरात क्रमांक : -०३

१. राज्य शासनाच्या कृषी व पदूम विभागातील कृषी आयुक्तालयाच्या अधिनस्त विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक यांच्या अधिनस्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट -क संवर्गातील कृषी सहाय्यकांची रिक्त पदे कृषी सेवक म्हणून निश्चित वेतनावर भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदांवरील भरतीकरता ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्रातील नेमून दिलेल्या केंद्रावर घेण्यात येईल. ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याबाबतच्या सूचना, अर्ज करण्याचा कालावधी याबाबतची स्वतंत्रपणे माहिती विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ऑनलाईन परीक्षेची तारीख कृषी विभागाच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल.

२. विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक व अधिनस्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे कृषि सेवक म्हणून भरण्यासाठी रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

२.१ — पदाचे नाव:- कृषि सेवक: -

२.१.१ अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) स्थानिक अनुसूचित जमाती या प्रवर्गाकारीता पदसंख्या : १३०
(रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे)

| जिल्हा | एकूण पदे (अनु. जमाती) | सर्व साधारण (अनु. जमाती) | महिला (३०%) (अनु. जमाती) | माजी सैनिक (१५%) (अनु. जमाती) | खेळाडू (५%) (अनु. जमाती) | प्रकल्प ग्रस्त ( ५%) (अनु. जमाती) | भुकंप ग्रस्त (२%) (अनु. जमाती) | अंश कालीन (१०%) (अनु. जमाती) | दिव्यांग (४%) (अनु. जमाती) | अनाथ (१%) (अनु. जमाती) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नाशिक | ६० | २० | १८ | ९ | ३ | ३ | १ | ६ | ५ (एकुण पदांत समाविष्ट) | १ (संस्थाअंतरगत) (एकुण पदांत समाविष्ट) |
| धुळे | २० | ७ | ६ | ३ | १ | १ | ० | २ | | |
| नंदुरबार | ४४ | १५ | १३ | ७ | २ | २ | १ | ४ | | |
| जळगाव | ६ | २ | २ | १ | ० | ० | ० | १ | | |
| एकूण | १३० | ४४ | ३९ | २० | ६ | ६ | २ | १३ | | |

टिप:- पेसा क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी विज्ञापित केलेल्या पदांसाठी त्याच जिल्हयातील स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार हेच अर्ज करू शकतील.

दिव्यांग प्रकारानुसार आरक्षित पदे (पेसा क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी)

| दिव्यांगत्व प्रकार | A) B, LV | B) D, HH | C) OA, OL, OAL, BL,CP, LC, Dw, AAV | D) ASD (M, MoD),ID, SLD, MI | E) MD involving (a) To (d) above |
|---|---|---|---|---|---|
| शारिरीक योग्यता | S, ST, W,BN, L,MF, SE, C | | | | |
| आरक्षित पदे | | | | | |
| नाशिक | १ | २ | ० | २ | |
| धुळे | | | | | |
| नंदुरबार | | | | | |
| जळगाव | | | | | |

टिपः- कृषी सेवक पदासाठी दिव्यांगांसाठी - सुनिश्चीत केलेली पदी ही शासन निर्णय कृषी व पदुम विभाग दिनांक ०६ मे २०२२ नुसार आहेत.

FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED: S=Sitting, ST=Standing, W=Walking, BN=Bending , L=Lifting, KC=Kneeling &Crouching, JU=Jumping, CRL= Crawling, CL=Climbing, PP=Pulling & Pushing, MF=Manipulation with Fingers, RW=Reading & Writing, SE=Seeing, H=Hearing, C=Communication

CATEGORY ABBREVIATIONS USED: B=Blind, LV=Low Vision, D=Deaf, HH= Hard of Hearing, OA=One Arm, OL=One Leg, BA=Both Arms, BL=Both Leg, OAL=One Arm and One Leg, BLOA=Both Leg & One Arm , BLA=Both Legs Arms, CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, MDy= Muscular Dystrophy, ASD= Autism Spectrum Disorder (M= Mild, MoD= Moderate), ID= Intellectual Disability, SLD= Specific Learning Disability, MI= Mental Illness, MD=Multiple Disabilities

२.१.२ अनुसूचित क्षेत्राबाहेरील पदसंख्या — १८९

(रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे)

| प्रवर्ग | एकूण पदे | सर्व साधारण | महिला (३०%) | माजी सैनिक (१५%) | खेळाडू (५%) | प्रकल्प ग्रस्त ( ५%) | भुकंप ग्रस्त (२%) | अंश कालीन (१०%) | दिव्यांग (४%) | अनाथ (१%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जाती | २२ | ८ | ७ | ३ | १ | १ | ० | २ | ८ (एकुण पदांत समाविष्ट) | २ (१ संस्था अंतर्गत व १ संस्थाबाहय) (एकुण पदांत समाविष्ट) |
| अ.जमाती | ७ | ३ | २ | १ | ० | ० | ० | १ | | |
| वि.जा. (अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (ब) | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (क) | ७ | ३ | २ | १ | ० | ० | ० | १ | | |
| भ.ज. (ड) | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | | |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| इ.मा.व | ४१ | १४ | १२ | ६ | २ | २ | १ | ४ | | |
| आ.दु.घ. | २३ | ९ | ७ | ३ | १ | १ | ० | २ | | |
| अराखीव पदे | ८५ | २७ | २६ | १३ | ४ | ४ | २ | ९ | | |
| एकूण पदे | १८९ | ६६ | ५८ | २७ | ८ | ८ | ३ | १९ | | |

दिव्यांग प्रकारानुसार आरक्षित पदे

| दिव्यांगत्व प्रकार | A) B, LV | B) D, HH | C) OA, OL, OAL, BL,CP, LC, Dw, AAV | D) ASD (M, MoD),ID, SLD, MI | E) MD involving (a) To (d) above |
|---|---|---|---|---|---|
| शारिरीक योग्यता | S, ST, W,BN, L,MF, SE, C | | | | |
| आरक्षित पदे | २ | ० | ० | ६ | |

टिपः- कृषी सेवक पदासाठी दिव्यांगांसाठी - सुनिश्चीत केलेली पदी ही शासन निर्णय कृषी व पदुम विभाग दिनांक ०६ मे २०२२ नुसार आहेत.

FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED: S=Sitting, ST=Standing, W=Walking, BN=Bending , L=Lifting, KC=Kneeling &Crouching, JU=Jumping, CRL= Crawling, CL=Climbing, PP=Pulling & Pushing, MF=Manipulation with Fingers, RW=Reading & Writing, SE=Seeing, H=Hearing, C=Communication

CATEGORY ABBREVIATIONS USED: B=Blind, LV=Low Vision, D=Deaf, HH= Hard of Hearing, OA=One Arm, OL=One Leg, BA=Both Arms, BL=Both Leg, OAL=One Arm and One Leg, BLOA=Both Leg & One Arm , BLA=Both Legs Arms, CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, MDy= Muscular Dystrophy, ASD= Autism Spectrum Disorder (M= Mild, MoD= Moderate), ID= Intellectual Disability, SLD= Specific Learning Disability, MI= Mental Illness, MD=Multiple Disabilities

२.१.३ अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गा व्यतिरीक्त इतर प्रवर्गातून भरावयाची पद संख्या : — १७
(रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे)

<table>
<tr><th>प्रवर्ग</th><th>एकूण पदे</th><th>सर्व साधारण</th><th>महिला (३०%)</th><th>माजी सैनिक (१५%)</th><th>खेळाडू (५%)</th><th>प्रकल्प ग्रस्त ( ५%)</th><th>भुकंप ग्रस्त (२%)</th><th>अंश कालीन (१०%)</th><th>दिव्यांग (४%)</th><th>अनाथ (१%)</th></tr>
<tr><td>अ.जाती</td><td>४</td><td>२</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td rowspan="9">१<br>(एकुण पदांत समाविष्ट)</td><td rowspan="9">०</td></tr>
<tr><td>वि.जा. (अ)</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>भ.ज. (ब)</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>भ.ज. (क)</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>भ.ज. (ड)</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>वि.मा.प्र.</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>इ.मा.व</td><td>२</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>आ.दु.घ.</td><td>२</td><td>१</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>अराखीव पदे</td><td>८</td><td>४</td><td>२</td><td>१</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>१</td></tr>
<tr><td>एकूण पदे</td><td>१७</td><td>९</td><td>५</td><td>२</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>१</td><td></td><td></td></tr>
</table>

दिव्यांग प्रकारानुसार आरक्षित पदे

<table>
<tr><th>दिव्यांगत्व प्रकार</th><th>A) B, LV</th><th>B) D, HH</th><th>C) OA, OL, OAL, BL,CP, LC, Dw, AAV</th><th>D) ASD (M, MoD),ID, SLD, MI</th><th>E) MD involving (a) To (d) above</th></tr>
<tr><td>शारिरीक योग्यता</td><td colspan="5">S, ST, W,BN, L,MF, SE, C</td></tr>
<tr><td>आरक्षित पदे</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td colspan="2">१</td></tr>
</table>

टिप:- कृषी सेवक पदासाठी दिव्यांगांसाठी - सुनिश्चीत केलेली पदी ही शासन निर्णय कृषी व पदुम विभाग दिनांक ०६ मे २०२२ नुसार आहेत.

FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED: S=Sitting, ST=Standing, W=Walking, BN=Bending , L=Lifting, KC=Kneeling &Crouching, JU=Jumping, CRL= Crawling, CL=Climbing, PP=Pulling & Pushing, MF=Manipulation with Fingers, RW=Reading & Writing, SE=Seeing, H=Hearing, C=Communication

CATEGORY ABBREVIATIONS USED: B=Blind, LV=Low Vision, D=Deaf, HH= Hard of Hearing, OA=One Arm, OL=One Leg, BA=Both Arms, BL=Both Leg, OAL=One Arm and One Leg, BLOA=Both Leg & One Arm , BLA=Both Legs Arms, CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, MDy= Muscular Dystrophy, ASD= Autism Spectrum Disorder (M= Mild, MoD= Moderate), ID= Intellectual Disability, SLD= Specific Learning Disability, MI= Mental Illness, MD=Multiple Disabilities

टिप:- २.१.१ मधील पेसा क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी विज्ञापित केलेल्या १३० पदांसाठी त्याच जिल्हयातील स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार हेच अर्ज करू शकतील तर २.१.२ व २.१.३ साठी ही अट लागु राहणार नाही.

३. कृषी सेवक पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी:-

३.१ जाहिरातीत नमूद केलेल्या पद संख्येत व प्रवर्गनिहाय आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

३.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा / सूचना वेळोवेळी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या घोषणा / सूचनांच्या आधारे प्रस्तुत स्पर्धा परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

३.३ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पद संख्येमध्ये कमी/वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता एखाद्या प्रवर्गासाठी अथवा समांतर आरक्षणासाठी पद उपलब्ध नसले तरीही उमेदवारांनी सदर जाहिरातीस अनुसरून अर्ज करावेत. यास्तव प्रस्तुत जाहिरातीत पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे सदर परीक्षेसाठी अर्ज केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

३.४ परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व प्रवर्गनिहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी म्हणून विभागीय कृषी सहसंचालक नाशिक व व त्यांचे नियंत्रण अधिकारी म्हणून मा.आयुक्त कृषी, पूणे यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नियमानुसार क्षेत्रीय स्तरावर पदस्थापना देण्याचे पूर्ण अधिकार हे विभागीय कृषी सहसंचालक नाशिक यांना आहेत.

३.५ महिला,खेळाडू,माजी सैनिक,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त,अंशकालीन,दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३.६ उमेदवारांनी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (Domicile) असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.७ एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

३.८ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र व उपलबद्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन अर्ज सादर करताना सदर करणे आवश्यक आहे.

जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि.१२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचीकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि २५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेश्याच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यथे दाखल केलेल्या एस. एल. पी. मधील आदेशाच्या आधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सदर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल. याबाबतची तरतूद मान्य असलेबाबतचे बंधपत्र सादर केल्यानंतरच सदर उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यांत येतील.

३.९ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही -१०१२ /प्र.क्र.१६/१२ /१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.१० आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राधाओ-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रूवारी,२०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

३.११ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गात मोडत असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे अद्ययावत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.१२ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.१३ अराखीव ( खुला ) उमेदवाराकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषसंदर्भातील अटीची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा ( मागासवर्गीय उमेदवारासह ) अराखीव ( खुला ) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरिता

विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांचा मूळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३.१४ खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र सादर करणेसाठी महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णयदिनांक ४-५-२०२३ नुसार तरतुदी लागु राहतील.

महिलांसाठी आरक्षित पदांकरता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्र राज्याचे अधिवासी(Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दि.४ मे, २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन क्रिमीलेअर (Non Creamy Layer) प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

३.१५ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छीणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रीमिलेयर प्रमाणपत्र सदर करणे आवश्यक आहे.

३.१६ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ अभिप्रेत असेल.

३.१७ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.मकसी-१००७/ प्र.क्र.३६/ का.३६, दि.१० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार सदर पदांच्या सेवा प्रवेश नियमातील सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास ते उमेदवार त्या संबंधित पदांसाठी अर्ज करू शकतील. त्यासाठी संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवासी असल्याबाबतचा त्यांचा वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

३.१८ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे संबधित कायदा/नियम/आदेशानुसार विहीत नमुन्यातील प्रस्तुत जाहीरातीस अनुसरून अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेल्या दिनांकापूर्वीचे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे.

३.१९ भरती प्रक्रियेशी संबंधीत विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

३.१९.१ अनुसुचित क्षेत्रातील स्थानिक अनुसुचित जमातीतील उमेदवारांमधून भरावयाच्या पदांबाबत सूचना:-

उपरोक्त परिच्छेद क्रमांक २.१.१ मध्ये नमूद केलेली कृषि सेवक संवर्गातील रिक्त पदे ही अनुसुचित क्षेत्रातील आहेत. शासन अधिसूचना दिनांक ०९ जून २०१४ ,दिनांक २९ ऑगस्ट २०१९ व दिनांक ०८ ऑगस्ट २०२३ मधिल तरतुदी व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.४२७/१६-ब दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२३ नुसार ही पदे अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसुचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरावयाची असल्याने नाशिक विभागांतर्गत येणाऱ्या नाशिक,धुळे, नंदुरबार व जळगाव या जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांव्यतिरिक्त अनुसूचित क्षेत्राबाहेरील अनुसुचित जमातीच्या उमेदवारांना सदर पदाकरीता अर्ज करता येणार नाही. अधिसूचनेत नमुद केल्यानुसार **“ स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार ” याचा अर्थ जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वतः किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत.**

सदर पदासाठी अर्ज करणारा उमेदवार हा नाशिक विभागातील अनुसूचित क्षेत्रातील रहिवासी असावा, त्याचे आई-वडील किंवा त्याचे आजी- आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसुचित क्षेत्रामध्ये दिनांक २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत असणे आवश्यक असून तसा सबळ महसुली पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

अंतीम निवड झाल्यानंतर सदर उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी त्यांनी अनुसूचित क्षेत्रामधील स्थानिक रहिवासी असल्याबाबत सादर केलेल्या महसूली पुराव्याबाबत पडताळणी केली जाईल, त्यानंतरच पुरावा योग्य असलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना अनुसुचित क्षेत्रात (पेसा) नियुक्ती/नेमणूक दिली जाईल.

३.१९.२ विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक संभागांतर्गत अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या नाशिक,धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील गावांची यादी महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का-५, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक ०९ मार्च १९९० नुसार शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तदनंतर शासनाने /सक्षम प्राधिकाऱ्याने अनुसूचित क्षेत्रात वेळोवेळी नविन गावे / वाडे/पाडे यांचा समावेश केलेला आहे. अर्ज करणाऱ्या उमेदवाराने आपल्या गावाचा समावेश अनुसूचित क्षेत्रात होत आहे याची खातरजमा करणे व नियुक्तीपुर्वी आपल्या गावाचा समावेश अनुसूचित क्षेत्रात होत आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी ही संपूर्णत: उमेदवाराची राहील. यासाठी सक्षम महसुली प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र/पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

३.२० खेळाडू आरक्षण:-

३.२०.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संकीर्ण- : १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

३.२०.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३.२०.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय क्रिडा उपसंचालक कार्यालयाकडे परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

३.२०.४ कागदपत्रे पडताळणीवेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील आरक्षित पदावरील निवडीकरिता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी बाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवाराचा संबधित प्रवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.

३.२०.५ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधीत उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४. दिव्यांग आरक्षण :-

४.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र. ११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.२ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या संवर्ग/ पदांच्या बाबतीत शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक कृषिआ-२५१९/प्र.क्र.५३/१६-ए दिनांक ०६ मे, २०२२ अन्वये दिव्यांगासाठीची पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत.

४.३ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.४ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.५ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

४.६ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकी - २०१८ / प्र. क्र ४६/ आरोग्य -६ , दिनांक १४ सप्टेंबर , २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४.७ अनाथ आरक्षण -:

४.७.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र./१२२/का-०३, दिनांक ६ एप्रिल, २०२३ व समक्रमांकाचे शासन पुरक पत्र दि.१० मे, २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

४.७.२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

४.७.३ अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांचेकडे सद्यस्थितीत उपलब्ध असलेले प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य तसेच दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक राहीलअन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा . विचारात घेतला जाणार नाही.

४.७.४ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत सक्षम प्राधिकारी/आयुक्त, महिला व बालविकास पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी / विभाग प्रमुख यांची राहील.

४.८ माजी सैनिकांकरीता आरक्षण :-

४.८.१ गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दि.२ सप्टेंबर, १९८३ नुसार

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५ % राखीव पदापैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब) युद्ध काळात व युद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तिला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने १५ % आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील.

क) माजी सैनिक उमेदवाराकडे कृषी सेवक पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक अर्हता (सांविधिक विद्यापीठाची कृषि विषयामधील पदविका) असणे आवश्यक आहे.

४.९ प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण :-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २० जानेवारी, १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकिय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करण्याऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल.

४.१० भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :-

सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय , क्रमांक: भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ,दिनांक २७ ऑगस्ट,२००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानूसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकिय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या भूकंपग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करण्याऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

४.११ पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षण :-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ,दिनांक २७ ऑक्टोबर,२००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानूसार पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठीचे आरक्षण राहील.

५. वेतनश्रेणी:-

| अ.क्र. | पदाचे नाव | निश्चित वेतन/एकत्रित मानधन |
|---|---|---|
| १ | कृषि सेवक | १. निश्चित वेतन/एकत्रित मानधन रुपये १६०००/- प्रतिमाह (कृषी व पदुम विभागाकडील शासननिर्णय क्र.कृषीआ-१११९/प्र.क्र.६७/१६ए दि.१/८/२०२३) |

६ पात्रता:-

६.१ भारतीय नागरीकत्व व महाराष्ट्राचा रहिवासी.

६.२ वयोमर्यादा -

६.२.१ जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय जाहिरात प्रसिद्ध केल्याच्या तारखेस गणण्यात येईल.

६.२.२

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | खुल्या प्रवर्गातील उमेदवार | किमान - १९ वर्षे व कमाल - ३८ वर्ष (सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआर व्ही -२०१५/प्र क्र ४०४ /का-१२ दि.२५/४/२०१६ मधील तरतुदीनुसार) |
| २ | मागासवर्गीय उमेदवार | किमान - १९ वर्षे व कमाल - ४३ वर्ष (सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआर व्ही -२०१५/प्र क्र ४०४ /का-१२ दि.२५/४/२०१६ मधील तरतुदीनुसार) |
| ३ | अंशकालीन उमेदवार | कमाल - ५५ वर्ष (सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.अ.शं.का१९१८ /प्रक्र५१८/१६ ए दिनांक २/१/२०१९ मधील तरतुदीनुसार) |
| ४ | प्राविण्य प्राप्त खेळाडू उमेदवार | किमान - १९ वर्षे व कमाल - ४३ वर्ष (शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्र.रा.क्रि.धो.-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १/७/२०१६ मधील तरतुदीनुसार) |
| ५ | दिव्यांग उमेदवार | किमान - १९ वर्षे व कमाल - ४५ वर्ष (सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.दिव्यांग /प्रक्र/११४/१६ ए दिनांक २९/५/२०१९ मधील तरतुदीनुसार) |
| ६ | भूकंपग्रस्त /प्रकल्पग्रस्त उमेदवार | किमान - १९ वर्षे व कमाल - ४५ वर्ष (सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रकल्प१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/१६ ए, दिनांक ३/२/२००७ मधील तरतुदीनुसार) |
| ७ | माजीसैनिक उमेदवार | सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे.<br>विकलांग माजी सैनिकांबाबतीत कमाल ४५ वर्षापर्यंत. वर्ष (सामान्य प्रशासन विभागाकडील शासन शुधीपत्रक क्र.मा.सै.क.१०१०/ प्र.क्र.२७९/१०/१६ए, दिनांक २०/८/२०१० मधील तरतुदीनुसार) |
| ८ | अनाथ उमेदवार | किमान - १९ वर्षे व कमाल - ४३ वर्ष वर्ष (महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.अनाथ २०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३/८/ २०२१मधील तरतुदीनुसार) |

टिप-१. कृषी व पदुम विभागाकडील अधिसूचना दिनांक २९/१/२०१८ अन्वये किमान वयोमर्यादा १९ वर्षे इतकी राहील.

२. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.सानिव २०२३/प्र.क्रं.१४/कार्या१२, दिनांक ३-३-२०२३ मधील तरतुदीनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

६.३ शैक्षणिक अर्हता व अनुभव :

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|
| १. कृषि सेवक | १. वेतन : निश्चित वेतन /एकत्रित मानधन रुपये १६०००/- प्रतिमाह (कृषी व पदुम विभागाकडील शासननिर्णय क्र.कृषीआ-१११९/प्र.क्र.६७/१६ए दि.१/८/२०२३ )<br>२. शैक्षणिक अर्हता : सांविधिक विद्यापीठाची कृषि विषयामधील पदविका किंवा पदवी किंवा कृषि विषयातील यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता. (शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षात अभ्यासक्रम पुर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहणार नाहीत.) उपरोक्त नमूद शैक्षणिक अर्हतेशिवाय अर्ज करणारे उमेदवार निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.<br>३. मराठी, इंग्रजी,सामान्य ज्ञान, बौद्धीक चाचणी परीक्षेचा दर्जा एस.एस.सी. (इयत्ता १० वी) अभ्यासक्रमावर आधारीत राहील व कृषि विषयाच्या परीक्षेचा दर्जा कृषि पदविका दर्जाचा राहील.<br>४. निवड झालेल्या उमेदवारांची कृषि सेवक पदी प्रथमत: १ वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल व त्यांचे काम समाधानकारक असल्यास पुढील २ वर्षासाठी दर वर्षी पुनर्नियुक्ती करण्यात येईल. याप्रमाणे कृषि सेवक पदी नियुक्तीचा प्रत्यक्ष कामाचा कालावधी ३ वर्षाचा राहील. ३ वर्षाचा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर त्या उमेदवारास पदांच्या उपलब्धतेप्रमाणे व आवश्यकतेनुसार कृषि सहाय्यक या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात येईल. |

६.३.१ अर्हता / पात्रता गणण्याचा दिनांक :-

कृषि सेवक पदाकरिता अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.

७. निवडप्रक्रिया : -

७.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता / पात्रते विषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

७.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा तसेच तरतुदीनुसार राबविण्यात येईल : -

(१) कृषि व पदूम विभाग, कृषि सहायक (सेवा प्रवेश) नियम, २०१८ दिनांक- २९.०१.२०१८ व ३०.०६.२०१८.

(२) कृषी व पदूम विभाग, शासन निर्णय दिनांक-१७.०२.२००४ व दिनांक- ०६.०२.२००७

८. निवडीची पद्धत : -

८.१. सर्व पदांसाठी फक्त मराठी माध्यमातून संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येईल. परीक्षा राज्यातील निश्चित केलेल्या जिल्हयाच्या मुख्यालयी घेण्यात येईल.

८.२ संगणक आधारीत परीक्षेव्दारे (Computer Based Online Examination) घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

८.३ संगणक आधारीत (Computer Based Examination) परीक्षेसाठी अभ्यासक्रम व इतर तपशील खालीलप्रमाणे राहील:

| अ.क्र | विषय | प्रश्न संख्या | गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २० | २० |
| २ | इंग्रजी | २० | २० |
| ३ | सामान्य ज्ञान | २० | २० |
| ४ | बौध्दिक चाचणी | २० | २० |
| ५ | कृषी विषय | ६० | १२० |
| एकूण | | १४० | २०० |

कृषी विषयाचा अभ्यासक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार राहील.

८.४. निवडसुचीची कालमर्यादा-

निवड समितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षासाठी विधीग्राह्य राहील. प्रकरणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. (सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रनिम १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४/५/२०२२)

९ . परिक्षा शुल्क :-

९.१ खुला (अराखीव) - १०००/-

९.२ राखीव प्रवर्ग -९००/-

९.३ शासनाने ज्या प्रवर्गासाठी परिक्षा शुल्कात सवलत दिली आहे त्यांना ती अनुज्ञेय राहिल.

९.४ उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच देय कर अतिरिक्त असतील.

९.५ परीक्षा शुल्क ना - परतावा ( Non - refundable) आहे.

१०. परीक्षा केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना:-

१०.१ उमेदवारांना नेमून दिलेले परीक्षा केंद्र व त्याचा पत्ता प्रवेश पत्रात नमूद करण्यात येईल संबंधित परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.

१०.२ उमेदवाराने एकदा केलेली परीक्षा केंद्राची निवड अंतिम असेल. परीक्षेचे केंद्र/स्थळ/तारीख/वेळ/ सत्र बदलण्याची कोणतीही विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

१०.३ कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे किंवा परिक्षा केंद्र वाढविणे याचे अधिकार विभाग स्वत: कडे राखून ठेवित आहे.

१०.४ उमेदवाराला त्याने /तिने निवडलेल्या केंद्रा व्यतिरिक्त इतर कोणतेही केंद्र वाटप करण्याचा अधिकार विभाग स्वत: कडे राखून ठेवीत आहे.

१०.५ उमेदवाराने परीक्षा केंद्रावर स्वतःच्या जोखमीवर आणि स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यास कोणताही प्रवास खर्च वा भत्ता दिला जाणार नाही किंवा उमेदवारांस कोणत्याही स्वरूपाच्या इजा किंवा नुकसानीसाठी विभाग जबाबदार राहणार नाही.

१०.६ उमेदवारांनी एखाद्या विशिष्ट परीक्षा केंद्राची पुरेशा संख्येने निवड केलेली नसल्यास किंवा एखाद्या केंद्राची निवड त्या केंद्राच्या उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांनी केलेली असल्यास उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी इतर कोणतेही संलग्न केंद्र वाटप करण्याचा अधिकार विभागास राहील.

१०.७ उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये ( अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी ) परत केले जाणार नाही.

११. दिव्यांग व्यक्तींसाठी मार्गदर्शक सूचना :- दृष्टिहीन व ज्यांच्या लेखन गतीवर कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे उमेदवार ऑनलाईन परीक्षे दरम्यान खालील मुद्दा ११.८ आणि ११.९ मध्ये नमूद मर्यादेच्या अधीन राहून लेखनिकाचा वापर करू शकतात. जेथे लेखनिक वापरला जातो अशा सर्व प्रकरणांसाठी खालील नियम लागू होतील:

११.१ उमेदवाराला त्याच्या / तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

११.२ उमेदवाराने निवडलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवा वापरण्यास पात्र व इच्छित उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद नसल्यास नंतर लेखनिक वापरण्याची केलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

११.३ लेखनिक म्हणून सेवा देणारी व्यक्ती एकापेक्षा जास्त उमेदवारांना लेखनिक म्हणून सेवा देऊ शकणार नाही. त्याबाबत उमेदवाराने आवश्यक ती काळजी घ्यावी.

११.४ लेखनिक उपरोल्लिखित सर्व विहित अर्हतेचे निकषांची पूर्तता करीत असल्याचे योग्य हमीपत्र उमेदवार आणि लेखनिक दोघांनाही परीक्षा सुरु होण्यापूर्वी समवेक्षक/केंद्र प्रमुख यांचेकडे द्यावे लागेल. तद्नंतर जर उमेदवार किंवा लेखनिक विहित अर्हतेच्या निकषांची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडविली असल्याचे निष्पन्न झाल्यास ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

११.५ जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात त्यांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनिटे अतिरिक्त वेळ भरपाई म्हणून देण्यात येईल. परीक्षेदरम्यान लेखनिकाने स्वतःहून प्रश्नांची उत्तर देऊ नयेत. असे कोणतेही वर्तन आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

११.६ उमेदवारांना दिलेला भरपाईचा वेळ संगणक प्रणालीवर आधारित असल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज करताना लेखनिकाची सेवा घेणार असल्याचे नमूद केलेले आहे अशा नोंदणीकृत उमेदवारांनाच अतिरिक्त वेळ देण्यात येईल. भरपाईच्या वेळेसाठी नोंदणीकृत नसलेल्या अन्य उमेदवारांना ऐनवेळी अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

११.७ परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षा संपन्न झाल्यानंतरही जर परीक्षेदरम्यान लेखनिकाच्या सेवांचा स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वापर केल्याचे परीक्षा प्रशासनास आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

११.८ अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना:- अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात (किमान ४०% दिव्यांगत्व) असलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्रामध्ये तसे नमूद केलेले असल्यास त्यांना प्रति तास २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

११.९ दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना:- दृष्टिहीन ( ज्यांना ४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व आहे ) उमेदवार परीक्षेसाठी मॅग्निफाइड फॉन्ट ची सुविधा उपलब्ध करण्याचा पर्याय घेऊ शकतात. तसेच अशा उमेदवारांना भरपाई म्हणून दर तासासाठी अतिरिक्त २० मिनिटे देण्यात येतील. जे उमेदवार परीक्षेसाठी लेखनिकाचा वापर करणार आहेत. त्या उमेदवारांना परीक्षेतील मजकूर मॅग्निफाइड फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टिहीन उमेदवारांना उपलब्ध होणार नाही.

११.१० सदरची मार्गदर्शक तत्त्वे केंद्र / महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या सूचनांनुसार / निर्णयानुसार असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

१२. अयोग्य वर्तन / अयोग्य माध्यमांचा वापर केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांविरुद्ध कारवाई :- उमेदवारांना सूचित केले जाते की त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना कोणतेही खोटे, छेडछाड केलेले किंवा बनावट तपशील सादर करू नयेत आणि कोणतीही महत्त्वाची माहिती लपवू नये. परीक्षेच्या वेळी किंवा त्यानंतरच्या निवड प्रक्रियेत, उमेदवार खालील बाबतीत दोषी असल्यास किंवा आढळून आल्यास असा उमेदवार त्याविरुद्ध फौजदारी खटला भरणे यासोबतच ज्या परीक्षेसाठी तो उमेदवार आहे त्या परीक्षेसाठी अपात्र ठरविणे, विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी कायमस्वरूपी किंवा विशिष्ट कालावधीसाठी अपात्र ठरविणे किंवा त्याच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१२.१ अयोग्य मार्गाचा अवलंब करणे,

१२.२ तोतयागिरी करणे किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे तोतयागिरी करून घेणे,

१२.३ परीक्षा हॉलमध्ये गैरवर्तन करणे किंवा चाचणीची सामग्री किंवा त्यातील इतर कोणतीही माहिती कोणत्याही स्वरुपात तोंडी किंवा लेखी ,इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिकरित्या कोणत्याही उद्देशाने उघड करणे, प्रकाशित करणे, पुनरुत्पादन करणे, प्रसारित करणे, संग्रहित करणे किंवा प्रसारित करणेसाठी सुलभ करणे,

१२.४ त्याच्या / तिच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही अनियमित किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब करणे ,किंवा

१२.५ अयोग्य मार्गाने त्याच्या / तिच्या उमेदवारीसाठी समर्थन मिळवणे, किंवा

१२.६ परीक्षा / मुलाखत हॉलमध्ये मोबाईल फोन किंवा संवादाची तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरणे बाळगणे.

१३ <u>उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना</u>:

१३.१ परीक्षा केंद्राचा पत्ता प्रवेश पत्रावर नमूद करण्यात येईल. परीक्षेचे केंद्र /स्थळ/ दिनांक /वेळ बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

१३.२ परीक्षा प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेनंतर परीक्षा केंद्रावर उपस्थित होणा-या उमेदवारांना परीक्षेला बसू देण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेचा कालावधी जरी १२० मिनिटाचा असेल तरी सुध्दा उमेदवाराना परीक्षा केंद्रावरील विहीत प्रक्रिया (उमेदवाराना महत्वाच्या सूचना देणे. उमेदवाराची व कागदपत्राची पडताळणी करणे, आवश्यक कागदपत्र जमा करणे लॉग इन करणे) पार पाडण्यासाठी उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान १ तास परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

१३.३ उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबंधित पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना / नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

१३.४ ओळख पटविणे- परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड/पारपत्र/वाहनचालक परवाना/मतदार ओळखपत्र/फोटो सहित आधारकार्ड/बॅकेचे फोटो सहीतचे पासबुक /महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे अलिकडील वैध ओळखपत्र /कर्मचारी ओळखपत्र/फोटोसहित असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख ही उमेदवाराचे प्रवेशपत्र हजेरीपत्रक/उपस्थितीपत्रक त्याने सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१३.५ रेशनकार्ड व तात्पुरता वाहन परवाना परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.

टिप-उपरोक्त परीक्षेला उपस्थित रहातांना उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची उपरोक्त नमूदपैकी आवश्यक ते मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायाकींत प्रती, परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराचे परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील आणि सादर केलेल्या ओळखपत्रावरील नांव आवेदनपत्रात नोंदणी केल्यानुसार तंतोतंत जुळणे आवश्यक राहील. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या मधल्या, शेवटच्या नावांत विवाहानंतर बदल झाला असल्यास त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबातचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रासह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१. परीक्षेसाठी वैध प्रवेशपत्र
२. मूळ फोटो ओळखपत्र
३. फोटो ओळखपत्राची छायाप्रत

१३.६ ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील त्यास विभाग कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. उमेदवारास ऑनलाईन अर्ज करताना कोणतीही शंका असल्यास त्याबाबत https://cgrs.ibps.in/ या हेल्पडेक्स लिंक (Helpdesk link) वर संपर्क साधता येईल.

टीप: - उमेदवारांना परीक्षेला उपस्थित असताना परीक्षेच्या प्रवेशपत्रासह ओळखपत्राच्या पुराव्याची छायांकित प्रत सादर करावे लागेल, त्याशिवाय त्यांना परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षार्थी उमेदवारांनी लक्षात ठेवावे की प्रवेशपत्रावर दिसणारे नाव (नोंदणी प्रक्रिये दरम्यान दिलेले) ओळखपत्रावर दिसत असलेल्या नावाशी तंतोतंत जुळले पाहिजे. विवाहानंतर नाव/आडनाव/मध्यम नाव बदललेल्या महिला उमेदवारांनी याची विशेष नोंद घ्यावी. प्रवेश पत्र आणि ओळखपत्रामध्ये दर्शविलेले नाव यामध्ये साम्य न आढळल्यास उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले आहे त्यांच्या बाबतीत, त्यांनी नाव बदलाबाबतचा पुरावा सादर केला तरच परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाईल.

१४ इतर अटी :-

१४.१ परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही ज्यामुळे ऑनलाईन चाचणी वितरणावर तसेच निकालावर परिणाम होऊ शकतो. अशावेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. तथापि यामध्ये उमेदवारांची हालचाल, व परीक्षेला विलंब होणे यासारख्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. परीक्षेचे फेर आयोजन हे विभागाच्या / परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेच्या पूर्ण निर्णयावर अवलंबून राहील. परीक्षेच्या फेर आयोजनासाठी उमेदवारांचा कोणताही दावा राहणार नाही. चाचणी वितरणाची विलंबित प्रक्रिया न स्वीकारणारे, हालचालीस नकार देणारे किंवा अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छूक नसलेले उमेदवार सरसकटपणे निवड प्रक्रियेतून बाद ठरविले जातील.

१४.२ परीक्षेशी संबंधित सर्व बाबींमध्ये विभागाचा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात विभागाद्वारे कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

१४.३ परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेतल्यास, विविध सत्रांमधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध सत्रांमधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील. परीक्षा केंद्राची / परीक्षा

केंद्रावरील नोडची (Node) क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास अशा केंद्रावर एकापेक्षा जास्त सत्रे आयोजीत केली जाऊ शकतात.

१४.४ विभाग उमेदवारांच्या वैयक्तिक प्रतिसादांचे (उत्तरे) विश्लेषण इतर उमेदवारांच्या प्रतीसादांशी अचूक आणि चुकीच्या उत्तरांच्या समानतेचे नमुने शोधण्यासाठी करेल. यासंदर्भात विभागाद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत, उमेदवारांनी उत्तरे एकमेकांसोबत वाटप (Share) केलेली आहेत आणि त्यांना मिळालेले गुण खरे / वैध नाहीत असा निष्कर्ष निघाल्यास विभाग अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवते तसेच अशा उमेदवारांचे निकाल रोखले जातील.

१४.५ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे किंवा उमेदवारांकडून निवड प्रक्रियेचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला / तिला यापुढे कोणत्याही निवड प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास प्रतिबंध करण्यात येईल .

१५ गुण पद्धती :- खालील पद्धतीचा अवलंब करून ऑनलाईन परीक्षेचे गुण ठरविले जातात:

१५.१ वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये प्रत्येक उमेदवाराने अचूक उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या अंतिम गुणांसाठी विचारात घेतले जातील.

१५.२ परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेण्यात आलेली असल्यास वरीलप्रमाणे उमेदवाराने संपादित केलेले अंतिम गुण विविध सत्रांमधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध सत्रांमधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील.

१६ निवडीचे निकष :- जाहिरातीत नमूद विविध पदांवरील नियुक्त्या या सदरच्या परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या (Merit List) आधारे निवड करून, करण्यात येतील. परीक्षेद्वारे निवडीसाठी आवश्यक किमान गुण व परीक्षेमध्ये उमेदवारांना समान गुण मिळाल्यास गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार राहील.

१७ उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यासाठी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील :

१७.१ परीक्षेसाठी केलेल्या ऑनलाईन आवेदन पत्राची छायांकित प्रत.

१७.२ शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे

१७.३ संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

१७.४ परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत.

१७.५ अर्जात नमूद केलेप्रमाणे जात प्रमाणपत्र/जात वैधत प्रमाणपत्र /नॉन क्रिमीलेअर/ इतर आवश्यक प्रमाणपत्र.

१८ सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-

१. प्रचलित नियमानुसार विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२. हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

३. संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय माहीती तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि.) विभाग क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक.

४. कृषी सेवक कालावधीत गैरवर्तन आढळून आल्यांस विभागीय चौकशीची कार्यवाही न करता अथवा कुठलीही पुर्वसूचना न देता त्यांच्या सेवा संपूष्टात आणण्यात येतील.

१९ . सदर जाहिरात कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ - नाशिक

दिनांक - ११/०८/२०२३

(मोहन प्रेमभाऊ वाघ)
विभागीय कृषि सहसंचालक,
नाशिक विभाग,नाशिक.

परिशिष्ट-अ

गट-क संवर्गातील कृषी सेवक सरळसेवा पदभरती बाबतचा अभ्यासक्रम

अ) कृषि सेवक लेखी परीक्षेकरिता त्या पदासाठी विज्ञापित सामान्य ज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी , मराठी व इंग्रजी भाषा विचारात घेऊन कृषी सेवक पदासाठी लेखी परीक्षेचा पाठयक्रम :-

१. सामान्य ज्ञान - २० प्रश्न - २० गुण

२. बुध्दीमत्ता चाचणी - २० प्रश्न - २० गुण

३. मराठी भाषा - २० प्रश्न - २० गुण

४. इंग्रजी भाषा - २० प्रश्न - २० गुण

ब) कृषी सेवक लेखी परीक्षेकरिता त्या पदासाठी विज्ञापित शैक्षणिक अर्हता व कृषी सहाय्यक पदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन कृषी सेवक पदासाठी लेखी परीक्षेचा पाठयक्रम - ६० प्रश्न - १२० गुण

१) मृद शास्त्र व्यवस्थापन -

१.१ जमिनीचे स्वाभाविक गुणधर्म-

जमिनिचे प्राकृतिक व भौतिक गुणधर्म, जमिनीचा पोत , घडण, रचना, घनता, पोकळी किंवा सच्छिद्रता, रंग, स्थिरता, तापमान किंवा उष्णतामान, जमिनिचे रासायनिक गुणधर्म , जमिनीचा सामु विद्युतवाहकता, सेंद्रिय कर्ब, मुक्त चुनखडी, मातीतील कलील, आघात, प्रतिबंधक योग्यता (सी.ई.सी) इत्यादी.

१.२ जमिनीचे जैविक गुणधर्म, सुक्ष्म जीवजंतू व त्यांचे उत्पादन क्षमतेशी असलेले संबंध, जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्य व त्यांच्या उपलब्धतेवर होणारा परिणाम, वनस्पतीसाठी लागणारी आवश्यक अन्नद्रव्ये, मुख्य, दुय्यम व सुक्ष्म अन्नद्रव्ये, त्यांचे कार्य व त्यांच्या कमतरतेची लक्षणे.

१.३ जमिनीतील पाण्याचे प्रकार आणि महत्व , पाण्याचे कार्य, जमिनीतील प्रवेश व हलचाल, जमिनीतील पाणी धरुन ठेवणे, जमिनीतील पाणी स्थिर पदे, जमिनीचे पाण्याचे नुकसान आणि पाण्याचे चक्र, जमिनीचा निचरा, निचरा पध्दती, अतिरिक्त पाण्याचे पीकावर व जमिनीवर होणारे परिणाम.

१.४ जमिनीची मशागत, तिचे प्रकार, औजारे व त्यांचा उपयोग, जमिनीची मशागत व तिचे फुल, मशागतीचे उद्देश, मशागतीच्या कामाचे प्रकार व त्यासाठी लागणारी निरनिराळी औजारे.

१.५ माती परीक्षण, महत्व उद्देश

२) २.१ - जमिन व्यवस्थापन, जमिनीची धूप, धूप होण्याची कारणे, धूपीचे निरनिराळे प्रकार व नुकसान, धूप थांबविण्याचे उपाय.

२.२ भुमि व जलसंरक्षणाच्या पध्दती, व्यवस्थापन पध्दती, यांत्रिकी पध्दती, भूमी सुधारण्याच्या व संरक्षणाच्या पध्दती, व्यवस्थापन पध्दती, यांत्रिकी पद्धती, भुमी सुधारणा व संरक्षणाच्या निरनिराळया शासकिय योजना

२.३ सेंद्रिय खते,प्रकार व त्याचे गुणधर्म, शेणखत बनविण्याच्या सुधारलेल्या पध्दती, कंपोष्ट खत बनविण्याच्या पध्दती, जैविक खते.

२.४ रासायनिक खतांचा प्रकार व त्यांचा होणारा वापर, रासायनिक खतांचा कार्यक्षम वापर होण्यासाठी निरनिराळी उपाययोजना, रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, रासायनिक खतांचा समतोल वापर, खते देण्याच्या पध्दती, खते घालताना घ्यावावयाची काळजी.

२.५ कोरडवाहू क्षेत्राची व्यवस्था - पाणलोट क्षेत्राचा कोरडवाहू शेतीमधील सहभाग ( पाणी अडवा पाणी जिरवा), पाणलोट क्षेत्राच्या पीकासाठी सामाजिक वनीकरण, मृद संधारण विभाग, फलोद्यान विभाग आणि सेवाभावी संस्थांचा सहभाग.

२.६ जमिनीचा आणि पाणी देण्याचा संबंध - पाणी देण्याच्या पध्दती, तुषार, ठिबक व बायऑल सिंचन पध्दती

३) पीक संवर्धन-

३.१ पीकसंवर्धन, पिकांचेवर्गीकरण, हवामानआणिहंगाम

३.२ बियाणे, बियाणाचे गुणधर्म, बियाच्या उगवणसाठी लागणाऱ्या आवश्यक गोष्टी

३.३ पीकाच्या वाढीसाठी लागणाऱ्या आवश्यक गोष्टी, जमीन, पाणी आणि हवामान.

३.४ तृणवर्गीय पिके, कडधान्य वर्गीय पिके, गळीतधान्य, हिरवळी खताची पिके

३.५ रोग नियंत्रणाची, कीड नियंत्रणाची सर्वसाधारण तत्त्वे

३.६ जैविक किड/ रोगनियंत्रण, एकात्मिक किड व रोगनियंत्रण.

३.७ कीटक नाशके व बुरशी नाशकांचा अभ्यास

३.८ साठवलेल्या धान्यातील किडी व त्यांचेनियंत्रण

३.९ बिजोत्पादन तंत्रप्रमाणीकरण, विलगीकरण, संकर कार्यक्रम, बिजोत्पादनाचे टप्पे.

४. पीक संवर्धन व शेती पुरक उद्योग -

४.१ निरनिराळया पीकपद्धती

४.२ पीकाचे पाणी व्यवस्थापन - पाणी व्यवस्थापन म्हणजे काय?
महत्त्व- विहिरीतील पाणी मोजने,व विहिरीची क्षमता काढणे, पीकांना पाण्याच्या वेळा ठरविण्याचे निकष, पाणी देण्याच्या निरनिराळया पद्धतींचा अभ्यास

४.३ आळींबी- माहिती आणि उत्पादनाचे तंत्र, खाण्या योग्य अळींबीचा अभ्यास व वर्गीकरण, अळिंबी उत्पादनासाठी आवश्यक असणारे साहित्य/ बाबी विषयी माहिती अळिंबीची काढणी आणि विक्री,प्रक्रिया आणि टिकविणे

४.४ रेशीमउत्पादनाची ओळख

५. उद्यान विद्या - रोपवाटिका आणि फळबाग व्यवस्थापन-

५.१ महाराष्ट्राचे हवामानानूसार पडलेले विभाग.

५.२ फळबाग यशस्वी करण्यासाठी आवश्यक बाबी, पर्जन्यमान, तापमान, आर्द्रता, जमिनीची निवड, योग्य जातीची निवड, पाणीपुरवठा, बाजारपेठ इ.

५.३ फळबाग लागवड व व्यवस्थापन पाणी / खते देण्याच्या पध्दती,

- सेंद्रिय खताचा निर्यातक्षम फळांच्या निर्मितीमध्ये महत्व
- आंतर मशागत आणि पाण्याचा निचरा करण्याच्या पध्दती
- तणाचा बंदोबस्त
- बहार धरणे पध्दती - मृग, हस्त व आंबेबहार
- छाटणी आणि वहण देण्याचे उद्येश व पध्दती -
- फुल धारणेच्या सवयी आणि फुल धारणेवर होणारे परिणाम, हवामान,रासायनिक द्रव्ये व अवस्था
- फळांचीगळ,विरळणी,पक्वता,काढणी अवस्था ओळखणे, प्रतवारी, पॅकींग,वाहतूक व विक्री व्यवस्था.

५.४ कोरडवाहू फळपिकांचे व्यवस्थापन

५.५ महाराष्ट्राच्या महत्वाच्या समशितोष्ण व उष्णकटिबंधातील आणि फळ झाडांची लागवड

५.६ फळपिका वरीलरोग व किडीं यांचे नियंत्रण

५.७ शासनाच्या फळबाग लागवडीच्या योजना

५.८ रोपवाटिका व्यवस्थापन- भाजीपाला व फुलझाडे यांच्या अभिवृध्दीचे प्रकार बियापासून शाकीय अभिवृध्दी- पध्दती,फायदेव तोटे

५.९ मातृ वृक्षाचे महत्त्व व निगा

५.१० हरितगृह, तुषारगृह यांचे आधुनिक शेतीतील महत्त्व, प्रकार व आकार व उभारणी

६. उद्यानविद्या - भाजीपाला आणि फुलांचे उत्पादन

६.१ भाजी पालयाचे वर्गीकरण

६.२ प्रमुख भाजीपाल्याची लागवड- - पालेभाज्या, फळभाज्या, वेलवर्गीय भाज्या, शेंगवर्गीय भाज्या, मुळ वर्गीय भाज्या, कंद वर्गीय भाज्या आणि कोबी वर्गीय भाज्या, बहुवर्षीय भाज्या

६.३ फुलशेती - महत्त्व व लागवडीस असलेला वाव

६.४ पुष्प उत्पादनात अवलंबिल्या जात असलेल्या खास बाबी - हरित गृहातील फुलशेती पुष्प - प्रदर्शनासाठी फुलांची निवड व तयारी

६.५ फुलपिकांच्या अभिवृध्दीच्या पद्धती

६.६ महत्त्वाच्या फुलझाडांची लागवड

६.७ फळे आणि भाजीपाला टिकविण्याच्या विविध पद्धती.

७ कृषी विस्तार

७.१ विस्ताराची मुल तत्त्वे, वैयक्ति कसंपर्क - शेतावर व घरी भेट, दूरध्वनी वरील चर्चा, वैयक्तिक चर्चा

७.२ कार्यालयीन भेट - गटसंपर्क - सभा, प्रात्यक्षिके, शैक्षणिक सहल, गट चर्चा

७.३ समुह संपर्क - शेतकरी मेळावे. कृषि दिन, प्रदर्शन, रेडिओ, दूरदर्शन, सभा.

७.४ शेती विषयक वाडमय - घडी पत्रीका, परिपत्रक, पुस्तिका, भित्तीपत्रक,तक्ते, आलेख, बातमी, नमुने छायाचित्र

७.५ दृकश्राव्य साधने - रेडिओ, दुरदर्शन, टेपरेकॉर्डर, चल चित्रपट, स्लाइड शो, व्हिडिओ कॅसेट, नाटक, तमाशा, कीर्तन.

७.६ संगणक - रचना,कार्य, उपयोग, माहिती साठविणे, माहितीची देवाणघेवाणइ.

७.७ विस्तार कार्यकर्ता- गुणकर्तव्ये व प्रकार

७.८ कार्यक्रमाचे नियोजन - तत्त्वे, पायऱ्या आणि फायदे

७.९ विकास योजना - माहिती, उद्देश, लाभार्थी, प्रशासन आणि फायदे, तोटे, कोरडवाहू क्षेत्र विकास योजना (डी.पी.अे.पी) , निर्धारीत लाभ क्षेत्र विकास कार्यक्रम, आदिवासी क्षेत्र विकास कार्यक्रम, डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रम,एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, एकात्मिक बळ विकास योजना, फळबाग विकास योजना , बहुविध पीक योजना,एकात्मिक कडधान्य सुधार योजना, एकात्मिक तेलबिया सुधार कार्यक्रम, राष्ट्रीय प्रात्यक्षिक योजना,राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प, एकात्मिक चारा विकास योजना, जवाहर रोजगार योजना, राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, कृषी विज्ञान केंद्र

७.१० महत्त्वाचे शेती विषयक कायदे- बि-बियाणे कायदा, रासायनिक खत नियंत्रण कायदा, कीटकनाशक कायदा, जंगल कायदा, तुकडे वंदी व तुकडे तोड कायदा.

८. कृषी व्यवसायातील वित्त व्यवस्थापन :-

८.१ कृषी व्यवसायात वित्त व्यवस्थापनाचे महत्त्व

८.२ कृषी व्यवसायात पत पुरवठयाची भूमिका

८.३ कृषी पत पुरवणा-या संस्था

८.४ कृषी पत प्रस्ताव (आर्थिक सुसज्जते साठी कृषी पत चाचणी)

८.५ कृषी व्यवसाय विश्लेषण

९. कृषी विपणन :-

९.१ शेतीमाल विक्री - व्याप्ती आणि महत्त्व.

९.२ शेतीमालाच्या बाजारपेठेचे प्रकार.

९.३ शेतीमाल विक्री व्यवस्थेतील माध्यम आणि संस्था.

९.४ शेतीमाल विक्रीच्या समस्या.

-------o--------

